शिक्षण संचालनालय महाराष्ट्र शासन
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
10 OCT 2016
आवक क्रमांक:- 28024
शाखा:- बीएड

क्रमांक :सीईटी-२०१६/प्र.क्र.२१३/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०७ ऑक्टोबर, २०१६.

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :- बी.एड अभ्यासक्रमासाठी सीईटी न दिलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत परवानगी मिळणेबाबत.**

**संदर्भ** :-१) अध्यक्ष, महाराष्ट्र विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्था चालक असोसिएशन यांचे दि.२६.०७.२०१६ रोजीचे पत्र,
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/२०१५-१६/प्रवेश प्रक्रिया/बी.एड, दि.१२.०७.२०१६.

संदर्भाधीन पत्रान्वये अध्यक्ष, महाराष्ट्र विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्था चालक असोसिएशन यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील बी.एड अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (CET) व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) द्वारे राबविण्यात येत आहे. यासंदर्भात राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेचे निकष व राज्यातील बी.एड अभ्यासक्रमांची नियमावलीमधील तरतुदींचे पालन करणे आवश्यक असल्यामुळे बी.एड अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांवर सामायिक प्रवेश प्रक्रिये बाहेरील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबतची महाराष्ट्र विनाअनुदान अध्यापक महाविद्यालय संस्था चालक असोसिएशनची विनंती शासनस्तरावर अमान्य करण्यात आलेली आहे. सदर बाब महाराष्ट्र विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्था चालक असोसिएशन व बी.एड/बी.पी.एड अभ्यासक्रमाशी संबंधित सर्व नोंदणीकृत संघटनाच्या निदर्शनास आणावी, ही विनंती.

B.Ed शाखा
10/10

(उर्मिला जोशी)
( उर्मिला जोशी )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

10/10